दूरध्वनी क्र.०२० २५५० ११२३
अपील प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर,पुणे -४११ ००५
कार्यालयीन वेळ :- स. १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी २.०० ते ०२.३०
ई मेल :- dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :- उआ(साप्र)/२७९
दिनांक :- 03/06/2017

अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त सामान्य प्रशासन यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
अपिल क्रमांक : पुणे मनपा /अ.प्रा.तथा उप आयुक्त सा.प्र./अपिल/१६/२०१७

**अपिलकर्त्याचे नाव व पत्ता :-**
श्री.गजानन श्रीपाद पाथूडकर,
कोथरूड अग्निशमन केंद्र,कोथरूड,
वारजे रोड,पुणे – ४११ ०३८

**जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :-**
श्री.शाम तारू.प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका

श्री.गजानन श्रीपाद पाथूडकर -अपिलार्थी
विरुद्ध
जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक ,अतिरिक्त आयुक्त विशेष कार्यालय ,पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

अपिलकर्ता यांनी दिनांक १४/०३/२०१७रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,अतिरिक्त आयुक्त विशेष कार्यालय,पुणे मनपा यांना अर्ज सादर केला असून जा.क्र.अतिमआ वि/२/१०१९,दि.०७/१०/२०१५ ची साक्षांकित प्रत मिळावी अशी मागणी केली आहे.

अपिलकर्ता यांनी मुळ अर्जाबाबतचा विषय अग्निशमन कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी,अग्निशमन कार्यालय यांचेकडे वर्ग केला आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकार अंतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी यांना उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १४/०३/२०१७ | १३/४/२०१७ | १०/०४/२०१७ | | |

अपीलकर्ता यांनी दिनांक २१/०४/२०१७ रोजी प्रथम अपील अर्ज केला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील ऑनलाईन सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| | १४/०३/२०१६ | होय | लागू नाही | |

**सदर अपिलाची सुनावणी दिनांक ०४/०५/२०१७ रोजी दुपारी ४.०० वा.घेण्यात आली** होती, परंतु अपिलकर्ता यांनी कार्यालयीन कामासाठी बाहेरगावी जावयाचे असल्याने पुढील तारीख मिळावी अशी मागणी निवेदनाद्वारे केल्याने अपील सुनावणी दि.३०/५/२०१७ रोजी दुपारी ४.०० वा.आयोजित करण्यात आली होती.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित होते.
सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक श्री.प्रभुणे - उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा /माहितीचा तपशील :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर /माहिती |
|---|---|---|
| १. | जाची २०१५/१०/०७.दि,१०१९/२/अतिमआ वि.क्र. साक्षांकित प्रत | मागितलेली माहिती अग्निशमन कार्यालयाशी संबंधित असल्याने सदरचा मुळ अर्ज जन माहिती अधिकारी,अग्निशमन कार्यालय यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. |

**विवेचन**

**सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता** यांनी सदरची माहिती जन माहिती अधिकारी ,अतिरिक्त आयुक्त( विशेष) यांचे कडून मिळणे अपेक्षित असल्याचे सांगितले. **जन माहिती अधिकारी यांनी** दि.१०/०४/२०१७ रोजी मूळ अर्ज अग्निशमन कार्यालयाकडे वर्ग केला असल्याचे प्रतिपादन केले.अपिलकर्ता यांनी अग्निशमन दलाकडे प्रथम अपील केले असल्याचे सांगितले.

**आदेश**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,अतिरिक्त आयुक्त विशेष कार्यालय यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. अपिल्कर्ता यांनी अग्निशमन दलाकडे प्रथम अपील दाखल केले असल्याने त्यांना प्रथम अपील अधिकारी,अग्निशमन कार्यालय यांचे आदेशाबाबत मा.राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे यांचेकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा पर्याय अपिलार्थी यांस उपलब्ध आहे.

प्रस्तुतचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश बोरसे)**
**उप आयुक्त (सामान्य प्रशासन)**
**पुणे महानगरपालिका**